MHKO070006342022

**संक्षीप्त फौजदारी खटला क्र. ३२३/२०२२** **निशाणी क्र. १२/ब**

# नि का ल प त्र
## ( दिनांक १८ नोव्हेंबर २०२२ )

आरोपी महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्याच्या संपरिक्षणास सामोरा जात आहे. दोषारोप (Particulars of offence) निश्चित केले असता त्याने लावलेले आरोप नाकारले आणि खटल्याच्या संपरिक्षणास सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०२) प्रस्तुत प्रकरणात अभियोगपक्षाने रविंद्र राजहंस सोनवणे या एकमेव घटनास्थळ–तथा–जप्ती पंचनाम्यावरील पंचाला साक्षीदार म्हणून तपासले आहे. त्याने अभियोगपक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष दिलेली नाही. प्रकरणामध्ये रासायनिक परिक्षण अहवाल दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाने निशाणी क्र. ११ वर तसदीकपत्र दाखल करुन पुरावा संपविला आहे.

०३) खटल्याच्या सुनावणीअंती फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये जबाब नोंदवण्याची आवश्यकता भासली नाही.

०४) अभियोग पक्षाचे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर.मिरजे आणि आरोपीचे विधीज्ञ श्री.एस.डी.जगदाळे यांचे युक्तिवाद ऐकले. अभियोग पक्षाची हकिकत, पटलावरील पुरावा आणि युक्तिवाद ऐकता प्रस्तुतचा खटला निकाली काढण्याकरिता माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित होतात, व त्यावरील निष्कर्ष आणि आवश्यक कारणे मी तद्नंतर विस्तृत करतो.

| मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१–** दिनांक २५/०२/२०२२ रोजी ०९.४५ वाजण्याच्या सुमारास नांदणी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील नांदणी ते शिरढोण रस्त्याच्या बाजूस असणा–या एका पत्र्याच्या शेडमध्ये आरोपीने एका प्लास्टीक कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टीची दारु बेकायदेशीरपणे विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगली, आणि त्याद्वारे महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिद्ध करतो काय? | – | नकारार्थी |
| **२–** काय आदेश ? | – | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>** :–

**०५)** साक्षीदार रविंद्र हा घटनास्थळ–तथा–जप्ती पंचनाम्यावरील पंच असून तो अभियोगपक्षाच्या हकीकतीप्रमाणे साक्ष देत नाही. पंचनाम्यावर त्याची स्वाक्षरी असल्याचे तो मान्य करतो, मात्र त्यातील मजकूर माहित नसल्याचे तो पुढे सांगतो. न्यायालयाच्या परवानगीने सरकारी वकिलांनी त्याची सविस्तर उलटतपासणी घेतली, मात्र पोलिसांनी त्याच्यासमक्ष छापा टाकून आरोपीकडून गावठी हातभट्टीची दारु जप्त केल्याचे आणि घटनास्थळ–तथा–जप्ती पंचनामा त्याच्यासमक्ष तयार करण्यात आल्याचे तो स्पष्टपणे नाकारतो.

**०६)** घटनास्थळ हे लोकवस्तीचे ठिकाण असून देखील अभियोगपक्षातर्फे स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब नोंदवण्यात आलेला नाही. अशा प्रकारच्या खटल्यांमध्ये रासायनिक परिक्षण अहवाल हा महत्त्वाचा पुरावा असतो. मात्र, रासायनिक परिक्षण अहवाल प्रकरणामध्ये दाखल करण्यात आलेला नाही. आरोपीकडून ज्या पंचनाम्याआधारे मुद्देमाल जप्त केल्याचे अभियोगपक्षाचे कथन आहे, त्यावर आरोपीची स्वाक्षरी अथवा अंगठा नाही.

**०७)** वरील सर्व बाबींचा एकत्रित विचार करता आरोपीविरुद्ध लावण्यात आलेले आरोप सिद्ध करण्यात अभियोगपक्षाला अपयश आल्याचे माझे मत बनते. त्यामुळे मुद्दा क्रमांक १

च्या उत्तरार्थ मी नकारार्थी निष्कर्ष नोंदवितो.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u> :–**

**०८)** मुद्दा क्रमांक १ वरील नकारार्थी निष्कर्षाआधारे आरोपीविरुद्ध लावण्यात आलेला आरोप सिद्ध करण्यात अभियोगपक्षास अपयश आल्याचे माझे मत बनते. त्यामुळे मुद्दा क्रमांक २ च्या उत्तरार्थ मी खालील आदेश पारित करतो.

## <u>आ दे श</u>

**१}** आरोपी **विश्वास प्रकाश धनगर** याची महाराष्ट्र दारुबंदी कायद्याच्या कलम **६५(ई)** अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यामधून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**२}** आरोपीचे बंधपत्र रद्द करण्यात येतात.

**३}** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) अन्वये रुपये १५,०००/– (पंधरा हजार रुपये) ची जमानत द्यावी.

Digitally signed by Anand Devidasrao Karbhajan
Date: 2022.11.18 18:12:15 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

( **आनंद दे. करभाजन** )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जिल्हा कोल्हापूर.

ठिकाण :– जयसिंगपूर
दिनांक :– १८/११/२०२२